# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.02.2025** **वारःशनिवार**

---

- अमेरिकेच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधानांचं देशात आगमन, धोरणात्मक, सुरक्षा सहकार्य, संरक्षण, व्यापार आदींविषयी चर्चा
- महाराष्ट्रात तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांकडून दिल्लीत आढावा
- तिसऱ्या काशी तामिळ संगमाला आजपासून वारासणीत सुरुवात
- पर्यावरणवादी चळवळीतल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या विमला बहुगुणा यांचं निधन आणि
- उत्तराखंड इथं 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा समारोप, लष्कराचा संघ पदकतालिकेत अव्वल

**<u>पंतप्रधान दिल्ली परत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं काल अमेरिकेच्या दौऱ्यावरून दिल्लीत आगमन झालं. या भेटीदरम्यान मोदींनी वॉशिंग्टन मध्ये ट्रम्प यांच्याशी द्वीपक्षीय चर्चा केली. त्यामध्ये धोरणात्मक, सुरक्षा सहकार्य, संरक्षण, व्यापार आणि आर्थिक सहभाग, तंत्रज्ञान तसंच चिंतेची बाब ठरू शकणाऱ्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांचा समावेश होता. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, उभय देश इंडो-पॅसिफिक प्रदेशात शांतता, स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी आणि समृद्धी वाढवण्यासाठी एकत्रित काम करतील याविषयी सहमती झाल्याचं सांगितलं. उभय देशांच्या नेत्यांनी 21व्या शतकासाठी कॉम्पॅक्ट म्हणजेच लष्करी भागीदारी, अर्थव्यवस्थेला गती आणि तंत्रज्ञानातल्या संधी यांना समर्थन देणाऱ्या मोहिमेची सुरुवात केली. व्यापार आणि गुंतवणूक क्षेत्रात दोन्ही नेत्यांनी सुरुवात केलेल्या मिशन 500 चा उद्देश द्वीपक्षीय व्यापार दुप्पट करत 2030 पर्यंत तो 500 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आलं आहे. ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित करताना, दहशतवादाविरोधातल्या लढाईत भारत-अमेरिका एकमेकांसमवेत ठामपणे उभे असून उभय देश सीमापर दहशतवाद संपवण्यासाठी ठोस कृती करण्याविषयीही सहमत आहेत.

**<u>फौजदारी कायदे-शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल दिल्लीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत राज्यातल्या तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेतली. या नव्या फौजदारी कायद्यांच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातलं पोलिस दल, तुरुंग, न्यायालयं, खटले आणि न्यायवैद्यकशास्त्राशी निगडीत नव्या विविध तरतुदींच्या अंमलबजावणी आणि सद्यस्थितीचा आढावा घेतला. राज्यातल्या सर्व आयुक्तांलयांमध्ये शक्य तितक्या लवकर नवे फौजदारी कायदे लागू करण्याची सूचना केली. या बैठकीला राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला आणि इतर वरिष्ठ उपस्थित होते. न्यायव्यवस्था मजबूत होण्यासाठी गुन्हांची नोंद होणं गरजेचं असून प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा विलंब लागू नये असे निर्देश शहा यांनी दिले.

या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी राज्य पोलिस दलाच्या 90 टक्के कर्मचाऱ्यांना नव्या कायद्यांबाबत प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती वार्ताहरांना दिली. सात वर्षांपेक्षा जास्त जुन्या खटल्यांच्या तपासासाठी राज्य सरकारनं 27 न्यायवैद्यकशास्त्र व्हॅन्स तैनात

केल्या असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. नव्या कायद्यांतर्गत, न्यायालयांमध्ये ऑनलाईन प्रणाली स्थापित केली असली तरीही न्यायालये, न्यायवैद्यक प्रयोगशाळेत समर्पित व्यवस्था उभारावी लागणार असून त्यावर काम सुरू असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. तारखांवर तारखा हे चित्र बदलवून कमी वेळात केस निकाली काढण्यासंदर्भात प्रयत्न केले जाणार असल्याचंही फडवणीस वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

**राष्ट्रपती- कर्नाटक**

देशातली स्त्री शक्ती, आकांक्षा बाळगत यश साध्य करून योगदान देण्यासाठी वृद्धींगत होत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांनी केलं आहे. महिलांनी मोठी स्वप्न पहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी धैर्य, ताकद आणि क्षमता गोळा करण्याचं आवाहन केलं आहे. बंगळुरू इथल्या आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरने आयोजित केलेल्या 10व्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या प्रतिनिधींना त्या संबोधित करत होत्या. महिलांनी निर्भय असावे, महत्त्वाकांक्षी ध्येये निश्चित करून अडथळे पार केले पाहिजेत. तसंच रुढीवादी कल्पनांना आव्हान दिले पाहिजे असंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. प्रत्येक व्यक्तीने करुणा, प्रेम आणि एकता या मानवी मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना, अर्थपूर्ण जीवन जगणे आणि कुटुंब, समाज आणि जगामध्ये योगदान देण्यासाठी महिलांच्या मानसिक आरोग्य राखणे गरजेचं  असल्याचं त्या म्हणाल्या.

**जागतिक-नेते**

फोरम ऑफ यंग ग्लोबल लीडर्सच्या पन्नास सदस्यीय शिष्टमंडळानं काल मुंबईत राजभवन इथं महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली. जागतिक सामाईक आव्हानांना तोंड देणे अशा प्रकारच्या भेटींमुळे शक्य होत असल्याचं राज्यपाल या प्रतिनिधींना संबोधित करताना म्हणाले. तरूण जागतिक नेत्यांमध्ये समताधिष्ठित आणि शाश्वत जग निर्माण करण्याची क्षमता असून, तरुण नेत्यांनी संपत्ती निर्माण करावी तसंच वंचितांना मदतीचा हात द्यावा असं आवाहनही राज्यपालांनी यावेळी केलं.

**काशी तामिळ संगमम**

तामिळनाडू आणि काशी यांच्यादरम्यान सांस्कृतिक आणि बौद्धिक सहसंबंधांना चालना देणारा काशी तामिळ संगम महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीला आजपासून उत्तरप्रदेशच्या वारासणी इथं प्रारंभ होत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि माहिती आणि प्रसारण आणि संसदीय व्यवहार राज्य मंत्री डॉ. एल मुरूगनही यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. दहा दिवसांच्या या महोत्सवात विद्यार्थी, तज्ज्ञ, विद्वान, तत्वज्ञ, व्यापारी, कारागीर, कलाकार तसंच सर्व स्तरातल्या नागरिकांना एकत्र येण्याची, ज्ञान, संस्कृतींची देवाण घेवाण करण्यासाठी तसंच एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याची संधी देतो. युवकांना सांस्कृतिक एकतेची जाणीव करून देणे आणि त्याचा अनुभव घेण्याची संधी देणे हा देखील महोत्सवाचा उद्देश आहे. यावर्षी पहिल्यांदाच सहभागींना प्रयागराजमधील महाकुंभ पाहण्याची आणि अयोध्येत राम मंदिराला भेट देण्याची संधी मिळणार आहे.

**भारत संचार निगम इंडिया**

भारत संचार निगम मर्यादितने 2024-25 या वर्षीच्या तिसऱ्या तिमाहीत 262 कोटी रुपयांचा नफा मिळवला आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगांना बळकटी देण्याच्या आणि सर्वसामान्यांसाठी मजबूत, किफायतशीर, सुलभ दूरसंचार सेवा सुनिश्चित करणाऱ्या सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक असल्याची माहिती केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल दिल्ली इथं दिली.

**पॅलेस्टाईन-ओलिस सुटका**

इस्रायलने आज गाझा पट्टीतील पॅलेस्टिनी सशस्त्र गट हमासच्या कैदेतून मुक्त होणाऱ्या तीन ओलिसांची नावे जाहीर केली आहेत. उभय देशांदरम्यान गेल्या महिन्यात झालेल्या युद्धविराम कराराअंतर्गत, पॅलेस्टाईनचे कैदी आणि ओलिस यांच्यात होत

असलेलं हे सहावं आदान-प्रदान आहे. तीन ओलिसांच्या बदल्यात इस्रायलकडून 369 पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका अपेक्षित आहे असं सूत्रांकडून सांगण्यात आलं.  या कैद्यांमध्ये 36 जण जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत आणि 333 जण गाझाचे रहिवासी आहेत.

**पाकिस्तान स्फोट**

पाकिस्तानमध्ये बलुचिस्तान प्रांतातल्या हरनाई इथं रस्त्यावर झालेल्या बॉम्बस्फोटात 11 कामगार ठार झाले आहेत, तर सात जण जखमी झाले आहेत. कोळसा खाण कामगारांना घेऊन जाणाऱ्या वाहन जात असताना हा स्फोट झाला. प्रगत स्फोटक यंत्राचा वापर करून ही रस्त्यावर स्फोटके पेरण्यात आल्याचा संशय हरनाईच्या पोलिस उपायुक्तांनी व्यक्त केला. दरम्यान, सुरक्षा दलांनी जखमींना रुग्णालयात हलवले आहे.

**निधन-विमला बहुगुणा**

पर्यावरणवादी चळवळीतल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या विमला बहुगुणा यांचं काल डेहराडून इथं निधन झालं. त्या 93 वर्षांच्या होत्या. सर्वोदयी कार्यकर्त्या असलेल्या विमला बहुगुणा यांनी 1953 ते 1955 दरम्यान बिहारमधे झालेल्या भूदान चळवळीत सक्रीय सहभाग घेतला  होता. ग्रामीण भागातल्या लहान मुलांचं शिक्षण तसंच महिलांना स्वावलंबी करण्याचं कार्य त्यांनी केलं. चिपको आंदोनलाचे नेते सुंदरलाल बहुगुणा हे त्यांचे पती होते.

**स्क्वॅश**

हॉंगकॉंग इथे सुरू असलेल्या आशियाई कनिष्ठ स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे महिला आणि पुरुष संघ उपांत्यफेरीत पोहोचले आहेत. उपांत्यफेरीत आज भारतीय महिलांचा सामना हॉंगकोंग संघाशी होणार आहे.

**राष्ट्रीय क्रीडा समारोप**

उत्तराखंड इथं सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचा काल समारोप झाला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते, यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचं सादरीकरण झालं. उत्तराखंड सरकारनं स्पर्धांचं यशस्वी आयोजन केल्याबद्दल शहा यांनी सरकारचं अभिनंदन केलं. 2036 मध्ये ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमानपद भूषवण्यासाठी भारत वचनबद्ध असून यासाठी देश पूर्णपणे सज्ज आहे असं शहा यांनी सांगितलं. 39 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा मेघालयमध्ये होतील अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. या स्पर्धेत लष्कराच्या संघानं सर्वाधिक 68 सुवर्णपदकं जिंकून पदकतालिकेत प्रथम क्रमांकाचं स्थान मिळवलं. महाराष्ट्रानं 54 सुवर्णपदकांसह एकंदर 201 पदकं जिंकत पदकतालिकेत दुसरं स्थान मिळवलं. महाराष्ट्राची एकंदर पदकसंख्या सर्वात जास्त आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.